# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४५/२०२५ दिनांक- ३०/०१/२०२५

## प्रेस नोट

### मा. श्री. योगेश कदम, राज्यमंत्री, गृह यांची मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालयास भेट

आज दि. ३०/०१/२०२५ रोजी **मा. श्री. योगेश कदम, राज्यमंत्री, गृह (शहरे), महसुल, ग्रामविकास व पंचायत राज , अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, अन्न व औषध प्रशासन** यांनी पुर्वनियोजित कार्यक्रमानुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालय येथे सकाळी १०.३० वाजता भेट दिली.

मा. मंत्री महोदयांचे पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर मा. मंत्री महोदयांनी पोलीस आयुक्त कार्यालयातील सर्व शाखा, विभाग, नियंत्रण कक्ष, संवाद हॉल यांची पाहणी केली. त्यानंतर मंथन हॉल येथे पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची बैठक घेतली. पोलीस आयुक्त यांनी आयुक्तालयाच्या कामकाजाविषयी सादरीकरण (पीपीटी) करुन विस्तृत माहिती दिली. मा. मंत्री महोदयांनी कामगिरीचा आढावा घेऊन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आगामी १०० दिवसांमध्ये करावयाच्या कामकाजाबाबत सुचना दिल्या. तसेच अंमली पदार्थ व अवैध वास्तव करणारे परकीय नागरीक यांचेविरुद्ध कडक कारवाई करण्याचे सुचना दिल्या. पोलीस आयुक्तालयाचे महाराष्ट्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांविषयी पाठपुरावा करुन सदरचे प्रस्ताव मंजूर होण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर अपर पोलीस आयुक्त यांनी मा. मंत्री महोदय यांनी दिलेल्या भेटीबाबत त्यांचे आभार व्यक्त केले व मा.मंत्री महोदय यांनी सर्व पोलीस अधिकारी यांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देऊन नियोजित कार्यक्रमाकरीता रवाना झाले.





SERVER & ELECTRICAL ROOM
P.I
WIRELESS
POLNET


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पोलीस आयुक्तालय
मिरा-भाईंदर, वसई-विरार






रस्ता सुरक्षा अभियान
२०२५
"Parvaah" or Care
दि. ०१ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५
श्री. मधुकर पाण्डेय
पोलीस आयुक्त
श्री. दत्तात्रय शिंदे
अपर पोलीस आयुक्त
श्री. सुहास बावचे
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
श्री. शंकर इंदलकर
सहा. पोलीस आयुक्त (वाहतूक)
वाहतूक विभाग
(मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय)
रस्ता सुरक्षा अभियान २०२५
राबविलेले उपक्रम
रस्ता सुरक्षा अभियान
२०२५
दि. ०१ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५

**------0000------**